# Current Global Reviewer

Peer Reviewed Multidisciplinary International Research Journal
PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

ISSN 2319-8648 | Impact Factor - 7.139 | Indexed (SJIF)

Nov. 2021 Special Issue [illegible] Vol. [illegible]

# राष्ट्रीय सेवा योजना विशेषांक
# 2021

राष्ट्रीय सेवा योजना
NATIONAL SERVICE SCHEME

**Chief Editor**
**Mr. Arun B. Godam**

11. संत गाडगेबाबा : सामाजिक विचार — 33

डॉ. जयदेवी पवार

12. व्यक्तीमत्व विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका — 36

प्रा.डॉ.अशोक नारायण गायकवाड

13. राष्ट्रीय सेवा योजना: स्वयंशिस्त व जबाबदार नागरिक घडविण्याचे एक प्रभावी माध्यम — 39

डॉ. श्रीराम त्रिंबक डोंगरे

14. राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका : — 42

प्रा .डॉ .गजानन हनवते .

15. राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास व सामाजिक बांधिलकी — 45

Dr. Phole Kamal Bhaurao

16. राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सेवा योजना — 48

प्रा.डॉ.आचार्य आर.डी.

17. "रामदरश मिश्र यांचा जिवन परिचय व साहित्यातील योगदान आणि कार्ये" — 50

अतुल तानाजी दळवे

18. "रा.रं.बोराडे व रामदरश मिश्र यांच्या साहित्याचां तुलनात्मक अभ्यास" — 51

अतुल तानाजी दळवे

19. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासात राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका. — 53

डॉ. गजानन देवराव चिट्टेवाड

20. भारतीय राज्यघटना आणि लोकशाही — 55

डॉ. वंदना माहुरे

21. यादव कालीन सावकारीचे स्वरूप. : एक अभ्यास — 57

डॉ. संजय बाबुराव वाकळे

**CURRENT GLOBAL REVIEWER**

| Special Issue 44, Vol. 1 | Peer Reviewed | ISSN : 2319 - 8648 |
|---|---|---|
| Nov. 2021 | SJIF | Impact Factor : 7.139 |


# राष्ट्रीय सेवा योजना, व्यक्तिमत्त्व विकास व सामाजिक बांधिलकी

Dr. Phole Kamal Bhaurao

Asst. Professor & Head, Dept. of Commerce D. B. College, Bhokar Tq. Bhokar Dist. Nanded

---

प्रस्तावना:

भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. भारताच्या इतिहासातील एका महत्त्वाच्या टप्प्यावर आपण आहोत. भारताचा दिवसेंदिवस विकास होत आहे असे वाटत असले तरी प्रत्यक्षात मात्र तसे निदर्शनास येत नाही. यामध्ये खरी जबाबदारी निर्माण होत आहे ते युवकांची. युवकांना योग्य शिक्षण, प्रशिक्षण व संस्कार मिळणे अनिवार्य आहे. राष्ट्रीय विकासाच्या संदर्भाने भारत सरकार मार्फत अनेकविध योजनांची अंमलबजावणी होताना दिसते. परंतु रोजगाराच्या कमी-अधिक संधीचा विचार करता आजच्या तरुणांसमोर एक उत्तम पर्याय उरलेला सांगता येईल आणि तो म्हणजे स्वयंरोजगार. जगाच्या तुलनेत भारतामध्ये सर्वात जास्त बेरोजगारांचे प्रमाण असल्याचे आढळून येते. यामुळे भारतातील लोकांना उत्तम दर्जाच्या रोजगार संधी मिळण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे. त्यांच्या कौशल्याला वाव मिळवून देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

संशोधन अध्ययनाचे महत्त्व:

देशातील तरुणांमध्ये कष्ट व मेहनत करण्याची तयारी व त्यातून राष्ट्र सेवेची भावना निर्माण होण्याची आज खरी गरज आहे. आपल्या देशाचा सामाजिक, समस्या, सांस्कृतिक व शैक्षणिक विकास घडविण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाची महत्त्वाची भूमिका निदर्शनास येते. देशातील युवा पिढीला सामाजिक जबाबदारीची जाणीव करून देणे, त्यांना नवचेतना व प्रेरणा देणे व त्यांच्या हातून निस्वार्थ समाजकार्य घडवून आणण्याचे काम हे देशातील राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाच्या माध्यमातून होत आहे. युवकांमध्ये नैतिक मूल्य रुजविणे व त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षणक्षेत्राद्वारे होत असतानाच तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे. आजच्या तरुणांमध्ये समाजसेवेची भावना निर्माण झाल्यानंतर त्यापुढील टप्पा म्हणजे राष्ट्रसेवा होय. डॉ. डी. एस. कोठारी शिक्षण आयोगाने शिक्षणाच्या सर्वच टप्प्यांवर विद्यार्थी समाजसेवेशी जोडला जावा, अशी शिफारस १९६४-६६ दरम्यान केली आणि १९६७ मध्ये राज्यांच्या शिक्षणमंत्र्यांच्या परिषदेत एनसीसीसोबत एनएसएस असावे हे मान्य झाले. त्यानंतर कुलगुरूंच्या परिषदेत राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वागत होऊन २४ सप्टेंबर १९६९ रोजी महात्मा गांधीजी यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्ताने तेव्हाच शिक्षणमंत्री व्ही. के. आरव्ही राव यांनी देशातील ३७ विद्यापीठांत प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना सुरू केली. आज देशातील हजारो महाविद्यालये व लक्षावधी विद्यार्थी या योजनेत सहभागी झाले आहेत. २४ सप्टेंबर हा 'राष्ट्रीय सेवा योजना दिन'म्हणून साजरा केला जातो.

संशोधन अध्ययनाची उद्दिष्टे:

1. राष्ट्रीय सेवा योजना ही संकल्पना सविस्तर समजून घेणे
2. राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व व उद्दिष्टे जाणून घेणे
3. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका जाणून घेणे.
4. योग्य निष्कर्ष काढून उपयुक्त अशा सूचना व शिफारशी देणे.

गृहीतकृत्ये:

1. युवकांमध्ये नैतिक मूल्य रुजविणे, त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व, तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे.
2. स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे.
3. राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान ठरली आहे.

राष्ट्रीय सेवा योजना - एक युवा चळवळ:

पर्यावरणासंबंधी वृक्षारोपण, सीसीटीव्हीचे काम, ग्रीन ऑडिट, आपत्ती व्यवस्थापन, जैवविविधता, निर्माल्य संकलन, जलसाक्षरता, समाजाप्रती कन्यारत्न वाचवा अभियान, आर्थिक, कौटुंबिक व शैक्षणिक सर्वेक्षण आदी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवीत आहे. राष्ट्रीय सेवा

योजनेची ही युवा चळवळ अखंड सुरू राहावी यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार मूलभूत योजनांचा सतत प्रचार व प्रसार या युवा चळवळीच्या माध्यमातून करीत आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना - प्रकल्पाची सुरुवात:**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या सूचनेनुसार डॉ. सी.डी. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमण्यात आली. या समिती नेमण्यामागचा प्रमुख उद्देश उच्च शिक्षण घेत असताना विद्यार्थी व युवकांचा राष्ट्राच्या उभारणीमध्ये योगदान असावे, यासंबंधी योजना तयार करणे हा होता. या समितीने अनेक देशातील युवकांशी संबंधित धोरणाचा अभ्यास करून राष्ट्रीय सेवा योजनेची सूचना केली होती. अशाच पध्दतीची शिफारस कोठारी आयोगाने १९६४ ते १९६५ मध्ये सूचविली होती. त्यानुसार स्वयंसेवी स्वरूपामध्ये एक कार्यक्रम दिला होता. ज्यामध्ये नॅशनल कॅरेट कोर (एनसीसी) याच आधारावर समाजसेवेसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्याची सूचना केली गेली. सप्टेंबर १९६७मध्ये कुलगुरूंच्या परिषदेमध्ये अशा प्रकारच्या सूचनेचे स्वागत करण्यात आले आणि त्यामध्ये एक समिती गठित करण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार समाजसेवा ही शिक्षणाचा एक भाग असेल अशा पद्धतीची शिफारस पुढे आली. या कुलगुरूंच्या समितीने सुचवल्याप्रमाणे चौथ्या पंचवार्षिक योजनेमध्ये योजना आयोगाने पाच कोटी अनुदान मंजूर केले. ज्या माध्यमातून निवडक महाविद्यालये व इतर संस्थांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर राष्ट्रीय सेवा योजना हा प्रकल्प सुरू करण्यात आला. या प्रकल्पाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचे जन्मशताब्दी वर्ष १९६९मध्ये होते. त्यावर्षी ही योजना सुरू करण्यात यावी असा विचार झाला. यानुसार २४ सप्टेंबर १९६९ रोजी 'राष्ट्रीय सेवा योजना' सुरू करण्यात आली.

**राष्ट्रीय सेवा योजनेची उद्दिष्टे:**

'Not me, but you' माझ्यासाठी नव्हे, तर तुमच्यासाठी हे ब्रीदवाक्य लक्षात घेऊन राष्ट्रीय सेवा योजनेची स्वयंसेवक सेवेची मूल्ये आणि सामाजिक भान ठेवून समाजसेवेसाठी तत्पर असतो. आपले उज्ज्वल भविष्य गाठत असतानाच समाज व राष्ट्राला आपण काही देणे लागतो म्हणून फूल ना फुलाची पाकळी या माध्यमातून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे राष्ट्रसेवा करण्याचे कार्य महाविद्यालयीन युवक करीत असतो.

राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उद्दिष्टे, ब्रीदवाक्य व बोधचिन्ह हे या उपक्रमाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करतात. स्वयंशिस्त, समाजसेवा, लोकशाही, मूल्यशिक्षण हे सर्व स्वयंसेवकांमध्ये रुजविण्यात राष्ट्रीय सेवा योजना यशस्वी झाली आहे. समाजात सामाजिक जाण देणारा, जनजागृती करणारा, तसेच राष्ट्र व समाजाप्रती जबाबदारीचे कार्य करणारा राष्ट्रीय सेवा योजना हा भारत सरकारचा अभिनव उपक्रम आहे.

**राष्ट्रीय सेवा योजना एक वरदान:**

आजच्या स्थितीमध्ये महाराष्ट्रातील विदयार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले प्रतिनिधित्व करीत आहेत. या विद्यार्थ्यांना रशिया, चीन, दक्षिण कोरिया, श्रीलंका या देशांमध्ये भारतीय शिष्टमंडळामध्ये समाविष्ट होण्याची संधी प्राप्त होत आहे. महाराष्ट्रातील महा विद्यार्थ्यांना या शिष्टमंडळात सहभागी होण्याची संधी मिळाली.

**महाविद्यालये व राष्ट्रीय सेवा योजना:**

राष्ट्रीय सेवा योजनेचे मुख्य उद्दिष्ट महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करून त्यांना सामाजिक कार्याचा सराव करण्यास वाव देणे, हे आहे. महाविद्यालयाचा परिसर स्वच्छ करणे, क्रीडांगणे तयार करणे, ग्रामीण विभागातील रस्ते बांधणे, प्रौढ शिक्षण, गलिच्छ वस्त्यांची सफाई, प्रथमोपचार, नागरी संरक्षण इ. कार्यक्रमांचा या योजनेत समावेश आहे. १९७६-७७ पासून ग्रामीण विभागाची सुधारणा, तसेच आर्थिक व सामाजिक दृष्ट्या कमजोर असलेल्या लोकांच्या विकासाची कामे यांवर भर देण्यात आला. या दृष्टीने ग्रामीण भागातील परिसराची सुधारणा व आरोग्य तथा कुटुंबनियोजन हे कार्यक्रम हाती घेण्यात आले. त्याचप्रमाणे उत्पादनविषयक कार्यक्रम, आणीबाणी, प्रौढ शिक्षण, मनोरंजन, बालकांसाठी उपक्रम इ. कामेही सुरू करण्यात आली. १९८५ च्या युवक वर्षामध्ये या कार्यक्रमांना विशेष उजाळा देण्यात आला.

**राष्ट्रीय सेवा योजना व सामाजिक बांधिलकीची जाणीव:**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून ग्रामीण भागात काम करताना विद्यार्थी चांगले सामाजिक संबंध प्रस्थापित करू शकतात. चांगले सामाजिक संबंध ठेवण्याकरिता सामाजिक कौशल्य अवगत करावे लागते. संवाद कौशल्यामुळे ते शक्य होऊ शकते. दुसऱ्या व्यक्तीच्या मनात आपले म्हणणे प्रस्थापित झाल्याची पावती त्या व्यक्तीकडून प्राप्त झाल्याशिवाय संवाद साधल्या गेला असे म्हणता येणार नाही म्हणून

संवाद कुशलतेने करण्याची आवश्यकता आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांना दत्तक गावात विविध प्रकारचे सर्वेक्षण करावे लागते. नवीन नवीन योजनांची माहिती घ्यावी लागते. त्यावेळी लोकांशी संवाद साधावा लागतो, या सरावामुळे ते संवादकौशल्य अवगत करू शकतात. वाचनाच्या सवयीमुळे भाषेवर प्रभुत्व मिळवता येते. वक्तृत्व हा एक व्यक्तिमत्त्वाचा प्रभावी पैलू आहे. राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना सभा संचालन, प्रास्ताविक भाषण, मनोगत, आभार प्रदर्शन करावयाचे असते. यामुळे त्यांच्या ठिकाणी सभाधीटपणा येतो. सरावाचे सातत्य टिकून ठेवल्यास त्यांची वक्तृत्व कला विकसित होते. सैदानी वक्तृत्वाचा लाभ होतो. भाषा प्रभुत्वामुळे मोठमोठ्या सभा जिंकण्यास ते समर्थ ठरतात. उपस्थित निरक्षरांपासून तर उच्चविद्या.विभूषितांमध्ये राष्ट्रीय विचार रुजवू शकतात. त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे ओघानेच त्यांच्याकडे नेतृत्व चालून येते, असे अनुभवाने सिद्ध झालेले आहे. अशाप्रकारे राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान ठरली आहे, यात शंका नाही.

निष्कर्ष:

1. राष्ट्रीय विकासाच्या संदर्भात भारत सरकार मार्फत अनेकविध योजनांची अंमलबजावणी होताना दिसते.
2. भारतातील लोकांना उत्तम दर्जाच्या रोजगार संधी मिळण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे.
3. युवकांमध्ये नैतिक मूल्य रुजविणे व त्यांचे प्रभावी व्यक्तिमत्त्व घडविण्याचे कार्य शिक्षणक्षेत्राद्वारे होत असतानाच तरुणांमध्ये सामाजिक बांधिलकीची जाणीव व सेवाभाव निर्माण करण्याचे कार्य महाविद्यालयीन स्तरावर राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाद्वारे होत आहे.
4. राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय, उद्दिष्टे, ब्रीदवाक्य व बोधचिन्ह हे या उपक्रमाचे स्वरूप आणि कार्य स्पष्ट करतात.
5. राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान ठरली आहे.
6. आजच्या स्थितीमध्ये महाराष्ट्रातील विदयार्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपले प्रतिनिधित्व करीत आहेत. या विद्यार्थ्यांना रशिया, चीन, दक्षिण कोरिया, श्रीलंका या देशांमध्ये भारतीय शिष्टमंडळामध्ये समाविष्ट होण्याची संधी प्राप्त होत आहे, हे सर्व राष्ट्रीय सेवा योजना या उपक्रमाद्वारे शक्य होऊ शकले.

सूचना व शिफारशी:

1. जगाच्या तुलनेत भारतामध्ये सर्वात जास्त बेरोजगारांचे प्रमाण असल्याचे आढळून येते. यामुळे भारतातील लोकांना उत्तम दर्जाच्या रोजगार संधी मिळण्यासाठी प्रशिक्षणाची गरज आहे.
2. देशातील तरुणांमध्ये कष्ट व मेहनत करण्याची तयारी व त्यातून राष्ट्र सेवेची भावना निर्माण होण्याची आज खरी गरज आहे.
3. राष्ट्रीय सेवा योजना ही महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी वरदान ठरली आहे.

संदर्भ:


1. इंटरनेट वेबसाईट्स
2. (http://lib.unipune.ac.in:8080/jspui/bitstream/123456789/9699/8/08_chapter2.pdf)
3. https://maharashtratimes.com/editorial/ravivar-mata/national-service-scheme-a-youth-activity/articleshow/60809330.cms
4. https://divyamarathi.bhaskar.com/news/EDT-national-service-scheme-and-personality-development-4378836-NOR.html
5. स्व निरीक्षणे
6. वर्तमानपत्रे आदी...